

# सशाची फजिती

लेखक: लीलाधर हेगडे

आवडत्या कथा : क्रमांक १

# ससाची फजिती


लेखक : लीलाधर हेगडे



© : लीलाधर हेगडे (१९६७)–कथाविषयक

© : सोमैया पब्लिकेशन्स प्रा. लिमिटेड (१९६७)–चित्रविषयक



चित्रकार : सुरेन्द्र सिरसाट



मुद्रक : मु. शं. किर्लोस्कर
किर्लोस्कर प्रेस, स्वार गेट–पुणे ९

प्रकाशक : कृ. रा. सामंत
सोमैया पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड मुंबई–१४

Rs. 2.00



# सशाची फजिती

पौर्णिमेची रात्र. गोल गरगरीत चांदोबा आकाशात आला होता. त्याला त्रास द्यायला आभाळात एकही ढग नव्हता. त्यामुळे चांदणे कसे छान पडले होते. जंगलातले पशू गुहेच्या बाहेर पडून आपले खाणे शोधत होते. कोल्होबाला आयतेच खाणे मिळाले. आदल्या दिवशी वाघाने एक रानरेडा मारला होता. त्याने ताव मारून उरलेला तसाच जंगलात पडला होता. कोल्होबाला तो दिसला. त्याला आनंद झाला. त्याने त्यावर ताव मारला. पोट गच्च

भरले. मग कोल्होबा खुशीत आले. म्हणाले, “ चांदणं कसं छान पडलंय ! जरा जंगलात मजेनं हिंडूया.” असे म्हणून कोल्होबा निघाले.

फिरता फिरता कोल्होबाला भेटला काळू. काळू म्हणजे सशीणबाईचा मुलगा. सशीणबाईना पिले खूप होती. पण त्यांचा लाडका होता काळू. सशीण-बाईची सर्व पिले पांढरी पांढरी शुभ्र होती. फक्त ह्या काळूच्या अंगावर एक काळा डाग होता. म्हणून त्याला सर्वजण काळू म्हणत.

काळू सर्वांची नजर चुकवून एकटाच निघाला होता फिरायला. त्याची पहिली गाठ पडली कोल्होबाशी.

काळूला पहाताच कोल्होबाच्या तोंडाला पाणी सुटले. पण क्रूरता



काय ! पोट गच्च भरले होते. कोल्होबाने ठरवले, काळूची गंमत करायची.

" काय काळू, कुठे निघालास ?" कोल्होबाने विचारले.

" निघालोय फिरायला." काळू म्हणाला.

" एक गंमत बघायची आहे तुला ?" कोल्होबा म्हणाले.

" गंमत ? खरंच बघायची आहे गंमत. दाखवतोस ?" काळू म्हणाला.

" आकाशात बघ. काय दिसतंय ? " कोल्होबा म्हणाले.

काळूने आकाशात पाहिले. " चांदोबा." काळूने उत्तर दिले.

" दिसतोय न चांदोबा ! आता चांदोबावर बघ कोण आहे. नीट बघ हं. " कोल्हा म्हणाला. काळू निरखून पाहू लागला.





“ दिसताहेत ना तुझे आजोबा ? ते बघ त्यांचे लांब लांब कान, छोटीशी शेपूट.” कोल्होबा वर्णन करू लागले.


“ अरे खरंच ! ” काळू ओरडला.

“ खरं आहे न ? मग जा की त्यांना भेटायला. ते तुझी वाट पाहात असतील. खाऊ देतील तुला. आईला सांग, मला चंद्रावरच्या आजोबांना भेटायचंय. ”

काळूने टुण्कन् उडी मारली आणि आपल्या बिळाकडे धूम ठोकली.

सशीणबाई काळूची वाट पाहात होत्या. “ काय रे काळू, कुठे गेला होतास इतका वेळ ? ” सशीणबाई म्हणाल्या.

“ आई आई ! मला कोल्होबा भेटले होते. त्यांनी एक गंमत दाखवली. ” काळू धापा टाकीत म्हणाला.





" कोल्होबा भेटले होते ! बाप रे ! " ससीणबाई भिऊन म्हणाल्या.

" अग हो. त्यांनी मला माझे चंद्रावरचे आजोबा दाखवले. म्हणाले की ते तुझी वाट पहात असतील. खाऊ देतील तुला. आईला जाऊन सांग की मला चंद्रावरच्या आजोबांना भेटायचंय. ए आई, मी जाऊ का ग त्यांना भेटायला चंद्रावर ? " काळू घाईघाईने बोलत होता.

" अरे काळू, कोल्होबा लुच्चे आहेत. त्यांनी तुझी गंमत केली. चंद्रावर कधी कोण गेलय का ? " काळूची आई त्याला समजावू लागली.

" कोणी गेलं नसेल तर मी जाईन. " काळू म्हणाला. " तिकडे जाईन आणि माझ्या आजोबांना भेटीन. "

" अरे, कोल्होबानं तुला फसवलं. चंद्रावर तुझे कुठले आले आहेत आजोबा ! कोल्होबाने तुला मारली थाप. तुझ्या आजोबांसंबंधी मला जास्त माहिती असणार की कोल्होबाला ? चल बाबा बिळात. झोप. खूप दमलाहेस.

तू. " असे म्हणून सशीणबाईने काळूला बिळात नेले, आणि आपल्या कुशीत घेतले. काळूला झोपवता झोपवता सशीणबाईचा डोळा लागला.

काळू जागाच होता. त्याला सारखे चंद्रावरचे आपले आजोबा दिसत होते. त्याने ठरवले की काही झाले तरी चंद्रावर जायचे आणि आपल्या आजोबांना भेटायचे. तो अगदी गुपचूप बिळाच्या बाहेर पडला. मग त्याने धूम ठोकली. पळता पळता तो विचार करीत होता. चंद्रावर जायचे कसे ? चंद्र तर खूप खूप उंच. मी तर अगदीच पिटुकला.

इतक्यात त्याला समोरून हत्ती येताना दिसला. बाप रे ! केवढा मोठ्ठा ! काळूला वाटले, या जंगलात सर्वात मोठा आहे हत्ती. त्याची सोंड नक्कीच चांदोबापर्यंत पोचेल. तो मला सहज चंद्रावर सोडील.

हत्तीने काळूला पाहिले. तो म्हणाला, " काय काळोबा, कुठे निघाली स्वारी ? "

" हत्तीदादा, हत्तीदादा, माझं तुमच्याकडे एक काम आहे. कराल ? " काळूने हत्तीला विचारले.

" हो करीन की. करण्यासारखं असेल तर ताबडतोब करीन. सांग बरं काय काम आहे तुझं ? " हत्ती म्हणाला.

" मला की नाही माझ्या आजोबांना भेटायला जायचंय चंद्रावर. ते पहा माझी वाट पाहताहेत. मला सोडता तिथं ? "

" मी कसा सोडणार तुला इतक्या उंच ? " हत्ती म्हणाला.


" मी तुमच्या सोंडेवर बसेन. तुम्ही तुमची सोंड उंच करा म्हणजे मी टुण्कन् उडी मारून चंद्रावर जाईन. " काळू म्हणाला.

" असं म्हणतोस ? ये बस माझ्या सोंडेवर. " असे म्हणून हत्तीने काळूला सोंडेवर बसवले आणि सोंड उंच केली.

काळूने खाली पाहिले. बाप रे ! जमीन खूप खूप खाली राहिली. त्याला वाटले, आता आपण टुण्कन् उडी मारू आणि चंद्रावर जाऊ. म्हणून त्याने वर पाहिले. तर चांदोबा आपला पूर्वीसारखा उंच उंच आभाळात !

" पाहिलस काळू चांदोबा किती उंच आहे. म्हणे चंद्रावर जायचंय ! तू असं कर. या जंगलात एक नारळाचं खूप खूप उंच झाड आहे. तू त्याच्याकडे जा. त्याच्या शेंड्यावर चढ. मग तिथून चांदोबाकडे जा. " हत्ती म्हणाला.

मग काळू हत्तीच्या सोंडेवरून उतरला आणि नारळाच्या झाडाकडे पळत पळत गेला. काळू नारळाच्या झाडाला म्हणाला, " नारळा, नारळा,





तुझ्या शेंड्यावर चढू का ? तुझ्या शेंड्यावर चढीन, तिथून टुण्कन् चंद्रावर उडी मारीन आणि माझ्या आजोबाना भेटीन. ते पाहा माझी वाट पहाताहेत."

नारळाचे झाड म्हणाले, " चढून तर बघ. "

मग काळू तुरुतुरू नारळाच्या झाडावर चढला. शेंड्यावर गेला. खाली पाहातो तर जमीन इतकी खोल होती की तिला पाहून काळूला वाटली भीती. छातीत धडधडू लागले. त्याला वाटले, आपण इतके उंच आलो आहोत की आता नक्कीच चंद्रावर जाऊ अन् आजोबाना भेटू. त्याने वर पाहिले. पाहतो तर चांदोबा आपला पूर्वीसारखाच आभाळात.

" पाहिलंस काळू, चांदोबा किती उंच आहे. म्हणे चंद्रावर जायचंय ! तू असं कर, घारूताईला विचार. माझ्या झावळ्यांत तिचं घरटं आहे. ती आकाशांत उंच उंच जाते. ती नेईल तुला चंद्रावर. " नारळाचे झाड म्हणाले.

काळू आला घारीकडे. घारीने झाडाचे बोलणे ऐकले होते.

ती म्हणाली, " तुला म्हणे चंद्रावर जायचंय–आजोबांना भेटायला !"

" हो ना ! मला नेतेस तुझ्या पाठीवर बसवून ? " काळू म्हणाला.

" अरे बाबा, मी कितीही उंच उंच उडाले तरी मी चंद्रापर्यंत काही जात नाही. चांदोबा आहे खूप खूप लांब. तू असं कर. माणसाकडे जा. तो विमानात बसतो, रॉकेटमधून उडतो आणि खूप खूप उंच जातो. तो नेईल तुला चांदोबाकडे. "






मग ससा नारळाच्या झाडावरून खाली उतरला आणि माणसा-कडे आला.

काळू माणसाला म्हणाला, " माणूसदादा, माणूसदादा, मला जायचंय चांदोबाकडे. तिथे माझे आजोबा राहातात. ते माझी वाट पाहातायत. तुम्ही मला बसवा तुमच्या रॉकेटमध्ये आणि चंद्रावर सोडा. म्हणजे मी माझ्या आजोबांना भेटीन. "

काळूचे हे बोलणे ऐकून माणसाला आनंद झाला. माणसाला स्वतःलाच चंद्रावर जायचे होते. पण त्याआधी त्याला कोणाला तरी तेथे धाडायचे होते. आयता ससा चालून आला.

माणूस काळूला म्हणाला, " हे बघ काळू, मी तुला रॉकेटमध्ये बसवीन. ते तुला चंद्रावर घेऊन जाईल आणि परत आणील. तिथे तुला कोण कोण भेटलं, काय काय दिसलं ते मला सांगायचं. करशील माझं काम ? "

" हो, करीन. " काळू आनंदाने म्हणाला.



मग माणसाने त्या सशाला रॉकेटच्या अगदी वरच्या टोकावर खोलीत नेऊन सोडले. रॉकेट उडवण्याची वेळ आली.

दहा, नऊ, आठ, सात, सहा, पाच, चार, तीन, दोन, एक – सुरू.

रॉकेटने खूप मोठा आवाज केला आणि एकदम आभाळात उडी घेतली. ससोबा रॉकेटमध्ये मजेत बसले होते. चांदोबावर केव्हा जाता येईल त्याची वाट पाहात होते. ते गाणे गुणगुणू लागले.

" चांदोबावर जाईन, मी जाईन
आजोबांसह राहीन, मी राहीन
मजेत खाऊ खाईन, मी खाईन
आईला मी पाहीन, मी पाहीन
तिला वाकुल्या दावीन, मी दावीन
'गंमत येते
जंमत येथे'
आनंदाने गाईन, मी गाईन
चांदोबावर राहीन, मी राहीन!"

खरोखरच चांदोबा जवळ येत चालला. गोरा गोरा चांदोबा आता काळसर दिसू लागला. आजोबा तर कुठेच नव्हते. जमिनीवरून दिसणारा छोटा चांदोबा आता मोठा दिसू लागला. माणसाने सांगितल्याप्रमाणे ससोबा पहात होते.

आस्ते आस्ते काळूचे रॉकेट चंद्रावर उतरले. काळू बाहेर पहात होता. त्याला तेथे दिसले डोंगर, दगड, खडक, खोल दऱ्या, गोल गोल खड्डे.

हिरवे गार गवत, नाही तर एखादे झाड, कुठे दिसते का ते काळू पाहू लागला. त्याचा तर पत्ता नव्हता. नदी तलाव कुठेच दिसेनात. पाण्याचे एक टिपूससुद्धा दिसेना. 'इथे कसे राहतील माझे आजोबा? इथे तर कुणी सुद्धा राहात नसेल.' काळू मनाशीच म्हणाला.

इतक्यात काळूच्या खोलीची खिडकी आपोआप उघडली. काळोबा घाबरत घाबरत बाहेर पडले आणि तुरुतुरु आत आले. बाहेर हवाच नव्हती श्वास घ्यायला. ससोबा घुसमटले. आणि गरम तर इतके होत होते, काळूला चटकाच बसला. काळोबाचा जीव कासावीस झाला.

काळू बाहेरून आत आला आणि खोलीची खिडकी आपोआप बंद झाली.

काळूची नजर मग सहज वर आकाशात गेली. बाप रे! आकाशाचा निळा रंग जाऊन त्याजागी काळा रंग दिसत होता. ज्या पृथ्वीवरून तो आला होता ती पृथ्वी त्याला त्या काळ्या आभाळात दिसली. चंद्र दिसत असे त्यापेक्षा



कितीतरी मोठी, सुंदर. आणि तिच्यापेक्षा लहान दिसत होता सूर्यनारायण. त्या काळ्या आभाळात तारे होते. पण चमचम मात्र करीत नव्हते. हे सर्व पाहिल्यावर ससोबा घाबरले. कारण त्याने असा देखावा यापूर्वी कधी पाहिलाच नव्हता. त्याने डोळे गच्च मिटले.


थोड्या वेळाने रॉकेट सुरू झाले. ते निघाले पृथ्वीकडे.

काळूने डोळे उघडले त्या वेळी त्याची खोली समुद्रात तरंगत होती. ती किनाऱ्यावर पोचली तेव्हा माणसाने त्याला विचारले,

" काय काळोबा, भेटले का आजोबा ? "

काळू म्हणाला, " कसले आजोबा अन् कसलं काय ! कोल्होबानं





मारली थाप. माझी आई म्हणाली तेच खरं. कोल्होबा लुच्चे आहेत." मग आपण चंद्रावर काय काय पाहिले ते काळूने माणसाला सांगितले.

काळू म्हणाला, "आता मी जातो माझ्या आईकडे. जाऊ ना ? तुम्ही सांगितल्याप्रमाणे तुमचं काम केलय. अच्छा." असं म्हणून काळूने उडी मारली आणि तो धूम पळत सुटला. आई भेटली तेव्हा थांबला.

काळू नाहीसा झाला म्हणून त्याची आई काळजी करीत बसली होती. काळूला धावत येताना पाहून तिला आनंद झाला.

"अरे काळू, गेला होतास कुठे इतका वेळ ? वाट पाहून पाहून थकले की रे मी." सशीणबाई म्हणाल्या.

"आई मी गेलो होतो चंद्रावर माझ्या आजोबांना भेटायला. मला त्या माणसानं रॉकेटमध्ये बसवून पाठवलं तिथं. अग कोल्होबानं मला फसवलं.

आजोबा बिजोबा कोणी नाहीत तिकडे. माझी फजिती झाली."

" मग मी काय सांगत होते तुला ? आईचं ऐकलं नाही की अशीच फजिती होते मुलांची. चल आत. तुझ्यासाठी हिरवं हिरवं छान गवत आणलंय. ते खा आणि झोप थोडा वेळ. मात्र न सांगता असा पुन्हा पळून बिळून जाऊ नकोस हं." सशीणबाई म्हणाल्या.

" आता नाहीच मी जायचा. आइचं ऐकलं नाही म्हणजे कशी फजिती होते ते मला कळलं." असे म्हणून काळोबा बिळात गेले आणि आईने आणून ठेवलेल्या हिरव्या हिरव्या गवतावर त्याने ताव मारायला सुरवात केली.

मग काळू आईच्या कुशीत सुखानं झोपी गेला. कितीतरी दिवसांत त्याला अशी गाढ झोप लागली नव्हती.







# सोमैया पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड

१७२ नायगाव क्रॉस रोड, दादर, मुंबई-१४.